| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस<br>सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | <u>पोलीस आयुक्तालय नवी मुंबई</u><br><u>प्रेसनोट</u> | 2025<br>CB/ 24/2025 |
| **गुन्हे शाखा, नवी मुंबई** | | **दिनांक २९.०४.२०२५** |

# अंमली पदार्थ विक्री करणा-या आरोपीतांना अंमली पदार्थ विरोधी पथक,गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचेकडुन अटक
# (आंतरराष्ट्रीय हायड्रो गांजा तस्करीची टोळी गुन्हे शाखेकडुन उघडकिस )

-----------------------------------

अंमली पदार्थ विरोधी पथक, नवी मुंबई यांनी दि.१४/०४/२०२५ रोजी केलेल्या विशेष कारवाईत गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे नेरूळ सेक्टर-१५ येथील आरोपीत आशिष गवारे याचे राहते घराशेजारी सापळा रचुन त्याचे घराचे टेरेसवर आरोपीत आशिष गवारे, अहमद ऑलगी व आकाश मौर्या हे हायड्रो गांजाची विक्री करण्याकरीता डिल करीत असताना आशिष गवारे व अहमद ऑलगी मिळुन आले व आकाश मौर्या हा पोलीसांची चाहुल लागताच टेरेसवरून पळुन गेला व त्यांनी विक्रीकरीता आणलेला १७.१९ ग्रॅम वजनाचा एकुण २,७६,५००/- रूपये किंमतीचा हायड्रो गांजा (इम्पोर्टेड गांजा) हा अंमली मिळुन आल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयातील अटक आरोपीत आशिष रमेश गवारे वय-२२ वर्षे, २) अहमद खालेद ऑलगी वय-२३ वर्षे, व इतर पाहीजे आरोपीत यांचेविरूद्ध नेरूळ पोलीस ठाणे गु.रजि.नं.२०१/२०२५ एन.डी.पी. एस.कायदा १९८५ चे कलम ८(क),२०(ब)(ii) (c), २९, २१(अ), बी.एन.एस.कायदा २०२३ चे कलम ३३८, ३३६(३), ३४०(२) अंतर्गत नेरूळ पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

अटक आरोपीत आशिष गवारे व अहमद ऑलगी यांचेकडे केलेल्या चौकशीत आरोपीत सुजित बंगेरा व साहिल लांबे व इतर पाहिजे आरोपी हे सदरचा हायड्रो गांजा थायलंड मधुन भारतात एअरपोर्ट मार्गे मागवित होते. सदरचा माल विमानाने एअरपोर्ट येथे आल्यानंतर आरोपीत कमलेश चांदवानी उर्फ के.के. हा परदेशी टपाल कार्यालयातील अटक कस्टम अधिकारी प्रशांत गौर याच्या मदतीने सदरचा माल सोडवुन विक्री करत होता इतर आरोपीच्या मदतीने नवी मुंबई परिसरामध्ये विक्री करीत होते.

अटक आरोपीत पोलीस हवालदार सचिन भालेराव नेमुणक खारघर पोलीस ठाणे हा गेल्या सहा महिन्यापासुन आरोपी कमल चंदवाणी उर्फ के. के. रा. खारघर याचे संपर्कात होता. आरोपी सचिन भालेराव व अटक आरोपी संजय प्रल्हाद फुलकर यांचेत गुन्हा घडल्यानंतर वारंवार एकमेकांच्या संपर्कात असल्याने दोन्ही पोलीस अंमलदारांना सुध्दा अटक करण्यात आली आहे.

यातील अटक आरोपीत सुजित बंगेरा व कमल चांदवानी यांचेकडुन रोख रक्कम घेवुन त्याबदल्यात USDT च्या माध्यमातुन पैसे ट्रान्सफर केलेले आहेत. सदर पैशांचा व्यवहार हा अंमली पदार्थाचे विक्रीतील असल्याने अंकित पितांबरभाई पटेल व रिकुंदकुमार दिनेशभाई पटेल या आंगडीयाचा व्यवसाय करणा-यांना अटक करण्यात आली आहे.

**गुन्हयाचे तपासामध्ये आज पावेतो अटक केलेले आरोपी -**

१) आशिष रमेश गवारे, वय-२२ रा. नेरूळ, नवी मुंबई
२) अहमद खालेद ऑलगी, वय-२३ रा. नेरूळ, नवी मुंबई
३) साहील शब्बीर लांबे, वय-२७ रा. नेरूळ, नवी मुंबई
४) सुजित रघुनाथ बंगेरा, वय-२८ (२ वेळा हॉकी नॅशनल प्लेअर)
५) कमल जयकिशन चांदवाणी, वय-५६ रा. खारघर, जि. रायगड
६) सचिन बाबुराव भालेराव, वय-४० रा. कामोठे, (पोलीस हवालदार ब.क्र. २०५७)
७) संजय फुलकर, वय-३६ रा. खांदा कॉलनी, (पोलीस नाईक ब.क्र. २६४३)

८) अंकित पितांबरभाई पटेल, वय-३७ रा.वाशी, नवी मुंबई(आंगडीया)
९) रिकुंदकुमार दिनेशभाई पटेल वय-३९, रा.वाशी (आंगडीया)
१०) प्रशांत विनोद गौर वय-४० रा.खारघर, अधीक्षक कस्टम, परदेशी टपाल कार्यालय मुंबई

**अंमली पदार्थ जप्त मुद्देमाल**

| अ. क्र. | जप्त अंमली पदार्थ | एकुण किंमत |
|---|---|---|
| ०१ | एकुण गांजा :- ०१ किलो १५ ग्रॅम | १,०१,५००/- |
| ०२ | एकुण हायड्रो गांजा :- १३७.५७ ग्रॅम | १३,७५,७००/- |
| ०३ | एकुण कोकेन :- ०१.८४ ग्रॅम | ९२,०००/- |
| ०४ | BOUTIQ SWITCH हायड्रो गांजा लिक्वीड असलेल्या २ बॉटल | ४०००/- |
| ०५ | अंमली पदार्थ सेवनाचे इम्पोर्टेड मशिन | ७०,०००/- |
| | **एकुण जप्त अंमली पदार्थ मुद्देमालाची किंमत** | **१६,४३,०००/-** |

**जप्त वाहने**

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | अंदाजे किंमत |
|---|---|---|
| १) | ग्रे रंगाची ह्युंडाई कंपनीची आय-२० कार तिचा नंबर M.H.05-A.J.7143 आकाश मौर्या | ५,००,०००/- |
| २) | एक सफेद रंगाची ह्युंडाई अल्काझर कार नंबर MH46-CR-5996 आरोपी केके यांचेकडुन जप्त | २०,००,०००/- |
| ३) | एक ग्रे रंगाची मारुती बलेनो कार नंबर MH46-CV-6543 आरोपी केके यांचेकडुन जप्त | १०,००,०००/- |
| ४) | एक इरटीगा कार नंबर MH46-BY4040, पोहवा/भालेराव यांचेकडुन जप्त | ७,००,०००/- |

**रोख रक्कम**

| | | |
|---|---|---|
| १) | आरोपीत यांचेकडुन अंमली पदार्थाच विक्रीतील जप्त केलेली रोख रक्कम आरोपी केके कडुन ९,३०,०००/-<br>आरोपी साहिल लांबे कडुन ४,८२,०००/- | १४,१२,६५०/- |

**इतर मुद्देमाल**

| | | |
|---|---|---|
| ०१ | आरोपीत यांचेकडुन जप्त करण्यात आलेला इतर मुद्देमाल<br>त्यामध्ये मोबाईल, अंमली पदार्थ विक्रीकरीता लागणाऱ्या प्लॅस्टीक पिशव्या, वजनकाटे, रिकामे लिफाफे,परदेशी यंत्र इत्यादी | १३८,२२५/- |

## गुन्हयातील एकुण जप्त मुद्देमालाची किंमत :- ७३,९३,९३५/-

सदरचा गुन्हा पोलीस आयुक्त, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे अपर पोलीस आयुक्त, श्री.दिपक साकोरे, गुन्हे, पोलीस उप आयुक्त, श्री.अमित काळे गुन्हे शाखा, सहायक पोलीस आयुक्त,श्री. भाऊसाहेब ढोले, आर्थिक गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील सर्व अधिकारी यांचे विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संदिप निगडे, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,गुन्हे शाखा, नवी मुंबई हे आहेत.

------------